# सायबर गुन्हेगारीबद्दल आयटीच्या विद्यार्थ्यांनी केली जनजागृती



**संचार प्रतिनिधी**

**लातूर, दि. १६-** वाढत्या सायबर गुन्हेगारीबद्दल समाजात जनजागृती करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर आणि क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर, धाराशिव, सोलापूर, परभणी या जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये व समाजातील अनेक घटकांसाठी राबविण्यात आला.

या उपक्रमासाठी माहिती तंत्रज्ञान विभागातील बीसीए व बी. एस्सी (सी.एस) च्या एकूण ४० विद्यार्थ्यांनी सायबर योध्दा व ज्योती वैजिनाथ माशाळकर यांची समन्वयक म्हणून काम केले. एकूण १९० शाळा व महाविद्यालये तसेच विविध शासकीय कार्यालये, बाजार समिती, बँका, साखर कारखाने आदी ठिकाणी जाऊन ७० हजारांपेक्षा अधिक लोकांना विविध सायबर फ्रॉडस् कसे घडतात व त्यापासून सावधगिरी कशी बाळगायची? याबद्दल माहिती दिली. यासाठी क्विक हिल फाउंडेशनचा स्मार्ट सायबर क्लब रनर अप-१ व प्रतीक्षा रमेश पांगे या विद्यार्थिनीला बेस्ट सेक्रेटरी रनर अप-१ हा पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.